शासुको–ऑडि. (जे) क्यूबी ३८९–५,७००–६७१

# नमुना क्र. ३४

## लेखापरीक्षा अहवाल (तालुका–गट सहकारी पर्यवेक्षक संघ (सुपरवायझिंग युनियन्स))

## विभाग दुसरा

**१. वर्गण्या आणि पर्यवेक्षण फी (सुपरव्हिजन फीज) :–**

१) सर्व सामील संस्थांनी आपल्या वर्गण्या दिल्या आहेत काय ते लिहा. येणे, वसूल आणि बाकी राहिलेल्या वर्गण्यांच्या रकमांचे आकडे लिहा.

२) देणग्या, प्रवेश फी आणि सभासदांच्या वर्गण्या या द्वारा मिळालेल्या सर्व रकमा राखीव निधीमध्ये जमा केल्या आहेत काय ? काही उणीवा असल्यास, लिहा.

३) अ) संघाला शासकीय अनुदान मिळाले आहे काय ?

ब) असल्यास, अशी मिळालेली रक्कम लिहा.

क) तिचा योग्य रीतीने उपयोग केला आहे काय ?

ड) अशा अनुदानाच्या मंजुरीकरिता घातलेल्या सर्व शर्तींचे संघ अनुपालन करीत आहे काय ते लिहा.

४) अ) सामील संस्थांकडून संघाने पर्यवेक्षण फी वसूल केली आहे काय ? वर्ष अखेरीस येणे, वसूल आणि यावयाच्या बाक्या लिहा. थकबाकीच्या वसुलीसाठी काय उपाय योजले आहेत ?

ब) काही पात्र अशा संस्थांची पर्यवेक्षण फीच्या माफीची प्रकरणे सादर केली आहेत काय ?

**२. सामिलीकरण :–**

१) संघ एखाद्या संयुक्त संस्थेला सामील झाला आहे काय? असल्यास, अशा संस्थेचे नाव लिहा.

२) संघाला सामील असलेल्या संस्थांची संख्या लिहा.

३) त्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकी पतपेढ्या ज्या

अ) संघाला सामील झाल्या आहेत,

ब) संघाला सामील झाल्या नाहीत,

अशांची संख्या लिहा.

४) बिगर पतीचे व्यवहार करणाऱ्या शेतकी पतपेढ्यांची संख्या लिहा.

५) बिगर शेतकी किंवा शेतकी बिगर पतीच्या काही संस्था संघाला सामील आहेत काय? असल्यास, अशा संस्थांची संख्या लिहा.

६) तालुक्यातील/गटातील सर्व खेडी शेतकी सहकारी पतपेढयांनी व्यापली आहेत काय ?

७) तालुक्यातील/गटातील पतपेढ्यातील सभासदांचे एकूण खातेदारांशी (शेतकऱ्यांशी) शेकडा प्रमाण लिहा.

८) सर्व शेतकरी खातेदारांना सामील संस्थांचे सभासद करण्याचे पुरेसे प्रयत्न संघाने केले आहेत काय ?

९) तालुक्यातील/गटातील अकार्यक्षम (डार्मन्ट) संस्थांची संख्या लिहा. अशा संस्थांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संघाने काय उपाय योजिले आहेत ते लिहा.

## ३. तदर्थ समिती (अॅडहॉक कमेटी):—

१) पोटनियमातील तरतुदीनुसार तदर्थ समिती बनविली आहे काय ते लिहा.

२) तदर्थ समिती योग्य रीतीने कार्य करीत आहे काय ते लिहा.

३) लेखापरीक्षा कालावधीत तदर्थ समितीने भरविलेल्या सभांची संख्या लिहा.

४) या सभातून मंजूर झालेल्या ठरावांची अंमलबजावणी झाली आहे काय ?

## ४. संयुक्त खर्चाचे हिशेब (जॉइंट एक्सपेंडिचर अकौंट)—

१) अ) संयुक्त निधीचा हिशेब तपासा. ठरवून दिलेल्या दराप्रमाणे सामील संस्थाकडून संयुक्त निधी गोळा केला जातो काय ते लिहा.

ब) ज्या दराने तो गोळा करतात तो लिहा.

२) वर्षाच्या आरंभीची संयुक्त निधीची एकूण थकबाकीची रक्कम, वर्षात आकारणी केलेली रक्कम, वसूल केलेली रक्कम आणि वर्षात वसूल व्हावयाची शिल्लक रक्कम लिहा.

३) आपल्या स्वतःच्या आस्थापनेचा (एस्टॅब्लिशमेंटचा) खर्च भागविण्यासाठी संयुक्त निधीचा काही भाग संघ वापरतो काय ?

४) संयुक्त निधी वर्गण्या आकारण्यासाठी योग्य नमुन्यात नोंदवही ठेवली आहे काय ?

५) कालावधीनुसार थकबाकीच्या रकमा लिहा.

अ) ५ वर्षावरील थकबाकी.

ब) ३ वर्षावरील थकबाकी.

क) २ वर्षावरील थकबाकी.

ड) १ वर्षावरील थकबाकी.

ई) १ वर्षाखालील थकबाकी.

५. हिशेबाची पुस्तके, लेखनसामुग्री इत्यादींचा पुरवठा :—

१) अ) सामील संस्थांना हिशेबाची पुस्तके, नमुने, लेखनसामुग्री इत्यादींचा पुरवठा करण्याचे काम संघ करतो काय ते लिहा.

ब) असल्यास, अशा पुरवठ्याची बाबवार किंमत लिहा.

२) लेखापरीक्षेच्या वेळी शिल्लक माल तपासा.

३) ह्या शिल्लक मालाची नोंदवही योग्य नमुन्यात ठेवली आहे काय? सर्वसाधारण अभिप्रायात विचार असल्यास व्यक्त करा.

६. अ) समूह चिटणीस :—

१) संयुक्त खर्च योजनेखाली नेमण्यात आलेल्या चिटणीसांची संख्या लिहा. अशा चिटणीसांची संख्या पुरेशी आहे काय?

२) प्रत्येक समूह चिटणीसाच्या ताब्यातील संस्थांची संख्या दर्शविणारे पत्रक मिळवा आणि जोडा.

३) हे सर्व चिटणीस प्रशिक्षित आहेत काय? प्रशिक्षित नसलेल्या चिटणीसांची संख्या लिहा.

४) अ) सर्व समूह चिटणीसाकडून पुरेसे जामीन घेतले आहेत काय?

ब) जामीनरोखे सुरक्षिततेसाठी बँकेमध्ये ठेवले आहेत काय?

क) जामीनदाराबद्दल पतदारी प्रमाणपत्रे मिळविली आहेत काय?

५) समूह चिटणीसासाठी संघाने सेवा आणि अन्य नियम तयार केले आहेत काय?

६) अ) समूह चिटणीसांच्या भविष्यनिर्वाह निधीसाठी संघाने नियम तयार केले आहेत काय?

ब) असल्यास, अशा भविष्यनिर्वाह निधीचे हिशेब स्वतंत्रपणे ठेवले आहेत काय?

७) लेखापरीक्षा कालात भरलेल्या समूह चिटणीसांच्या सभांची संख्या लिहा.

८) समूह चिटणीसांची फिरती पुरेशी होती काय? मंजूर झालल्या कार्यक्रमानुसार आपापल्या ताब्यातील संस्थांना भेटी दिल्या आहेत काय?

९) समूह चिटणीसांच्या सभांची इतिवृत्ते (प्रोसिडिंग्ज) स्वतंत्रपणे ठेवली आहेत काय ? समूह चिटणीसांच्या कामाचा आढावा अशा सभातून घेतात काय ?

१०) समूह चिटणीसाकडून हिशेबाच्या पत्रकासह सर्व विवरणे आणि माहिती नियमितपणे संघ मिळवतो आहे काय ?

**ब) पर्यवेक्षण :–**

१) संघात काम करणाऱ्या पर्यवेक्षकांची संख्या लिहा.

२) प्रत्येक पर्यवेक्षकाच्या ताब्यातील संस्थांची संख्या लिहा.

३) अ) प्रत्येक पर्यवेक्षकाने तपासलेल्या संस्थांची संख्या लिहा.

ब) तपासणी नोंदवही ठेवली आहे काय ?

क) प्रत्येक वर्षाच्या सुरवातीस तपासणीचा कार्यक्रम तयार केला आहे काय ? त्याचे योग्य रीतीने अनुपालन होत आहे काय ?

४) क आणि ड वर्गातील संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष लक्ष पुरविण्यात येते काय ?

**७) सामान्य :–**

१) ठरवून दिलेल्या कालमर्यादेत संघाकडून बँकेकडे कमाल पतमर्यादा पत्रके सादर केली जातात काय ? उशीरा पाठविण्यात आलेल्या पत्रकांची संख्या लिहा.

२) संबंधित संस्थांना पुढे रवाना करण्यासाठी आलेल्या लेखापरीक्षा अहवालांची नोंदवही संघाने ठेवली आहे काय ?

३) अ) दोषांच्या दुरुस्त्यावर आणि संस्थाकडून लेखापरीक्षकाकडे पाठविण्यासाठी लेखापरीक्षा दोष दुरुस्ती इतिवृत्ते मिळविण्यावर संघ योग्य लक्ष ठेवित आहे काय ?

ब) संघाकडे येण्यास पात्र असलेली लेखापरीक्षा दोष दुरुस्ती इतिवृत्ते, प्रत्यक्ष मिळालेली आणि लेखापरीक्षकाकडे पाठविलेली लेखापरीक्षा दोष दुरुस्ती इतिवृत्ते आणि संघाने सादर करावयाची अशी प्रलंबित इतिवृत्ते यांची संख्या लिहा.

४) अ) संघाच्या कार्यक्षेत्रातील कर्ज घेणाऱ्या संस्थांची संख्या लिहा.

ब) त्या पैकी किती थकबाकीदार आहेत ?

५) अ) सामील संस्थांच्या सभासदाकडून एकूण वसूल करावयाच्या आणि वसूल झालेल्या रकमा, शिल्लक बाक्या आणि थकबाक्या यांची माहिती संघाने ठेवली आहे काय ? असल्यास, वर्षाचे अखेरीचे असे आकडे लिहा आणि थकबाकीचे मागणी आणि येणे बाकीशी शेकडा प्रमाण लिहा.

ब) सहकारी विक्री सँस्थामार्फत आणि प्रक्रिया घटकामार्फत शेकडा काय प्रमाणात वसुली झालेली आहे ?

क) ज्यांनी आपल्या रकमा थकविल्या आहेत अशा सामील संस्थांच्या सभासदाविरुद्ध मिळविलेल्या वसुली प्रमाणपत्रांची आणि लवाद निवाड्याची माहिती संघाने ठेवली आहे काय ?

ड) सामील संस्थांच्या सभासदाकडील वसुलीसाठी संघ पुरेसे प्रयत्न करीत आहे काय ?

ई) पिकाकरिता कर्ज देणे, सभासद वाढ, इत्यादीकरिता काही परिषदा, सभा किंवा मोहिमा घेण्याची संघाने व्यवस्था केली आहे काय ? असल्यास, संबंधित नोंदवह्या ठेवल्या आहेत काय ?

६) अ) सामील संस्थांकडून लेखापरीक्षा फी वसूल करण्यासाठी संघ पुरेसे प्रयत्न करीत आहे काय ? असल्यास, संबंधित नोंदवह्या ठेवल्या आहेत काय ?

ब) वर्षातील लेखा परीक्षण शुल्काच्या वसुलीस पात्र असलेल्या वसूल झालेल्या आणि येणे बाकीच्या रकमा लिहा.

७) सामील संस्थांच्या लेखापरीक्षा वर्गीकरणाची माहिती खालीलप्रमाणे लिहा.

अ वर्ग :–
ब वर्ग :–
क वर्ग :–
ड वर्ग :–
अवर्गीकृत :–

एकूण

८) अ) वर्षात परिसमाप्ति केलेल्या ( टेकन इनटु लिक्विडेशन ) संस्थांची संख्या लिहा.

ब) वर्षअखेर परिसमाप्ति केलेल्या एकूण संस्था लिहा.

८. खर्च—

१) व्यवस्थापन समितीपुढे खर्चाची पत्रके नियमितपणे मंजुरीसाठी ठेवण्यात येतात काय ते लिहा.

२) सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने आपली वार्षिक अंदाजपत्रके संघाने तयार केली आहेत काय ? अंदाजपत्रकाच्या मर्यादेत खर्च आहे काय ? नसल्यास, पुनर्विनियोजनाला (रिएप्रोप्रिएशन) साधारण सभेने मान्यता दिली आहे काय ?



लेखापरीक्षा अधिकाऱ्याची सही व पदनाम.